Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

UME - VII, ISSUE - IV - October - December - 2018
ANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | सावित्रीबाई फुलेचे शैक्षणिक योगदान<br>**प्रा. डॉ. कैलास जे. गायकवाड** | १-५ |
| २ | सामाजिक परिवर्तनाच्या प्रणेत्या : सावित्रीबाई फुले !<br>**प्रा. निरंजन भा. ब्राम्हणे** | ६-८ |
| ३ | सावित्रीबाई फुले व सामाजिक परिवर्तन<br>**प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर** | ९-१२ |
| ४ | सावित्रीबाई फुले व सामाजिक परिवर्तन<br>**प्रा. रा. तु. आदे** | १३-१७ |
| ५ | सावित्रीबाई फुले आणि स्त्रिमुक्ती<br>**प्रा. डॉ. दिवाकर एन. कामडी** | १८-२१ |
| ६ | सावित्रीबाई फुलेंच्या भाषणांचा विश्लेषणात्मक अभ्यास<br>**प्रा. प्रीती किशोर उमाठे** | २२-२४ |
| ७ | सावित्रीबाई फुले : एक काव्य रचनाकार<br>**रायबोले अर्चना रामरतन** | २५-३१ |
| ८ | ज्ञानज्योति सावित्रीमाई फुले यांचे स्त्री, अनाथ व शोषीतांच्या शैक्षणिक व आर्थिक विकासामधील योगदान<br>**डॉ. देवराव सु. मनवर** | ३२-३७ |
| ९ | विधवा पुनर्विवाह व मानसिक बदल<br>**सहा. प्रा. डॉ. राहुल जी. गोंडाणे** | ३८-४१ |
| १० | स्त्रीमुक्ती चळवळीच्या प्रणेत्या : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले<br>**प्रा. डॉ. राजेंद्र यादवराव बारसागडे** | ४२-४६ |
| ११ | आधुनिक मराठी काव्याची जननी व अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या धनी : सावित्रीबाई फुले<br>**प्रा. अरविंद बा. पाटील** | ४७-५१ |
| १२ | स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या<br>**डॉ. एस. के. खंगार** | ५२-५५ |
| १३ | फुले काळ व कवि रचनाकार<br>**डॉ. अंजली आनंद चौरे** | ५६-५८ |

# ६. सावित्रीबाई फुलेंच्या भाषणांचा विश्लेषणात्मक अभ्यास

**प्रा. प्रीती किशोर उमाठे**
मराठी विभाग प्रमुख, डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, नागपूर.

महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाचे बीजारोपण महात्मा ज्योतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक विचार व कार्यात दिसून येते. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. सावित्रीबाई फुले यांनी समाज परिवर्तनासाठी शिक्षण साधन मानले. शिक्षणाशिवाय तळागळातील लोक व स्त्री समाजाच्या शिक्षणाने आपल्या कार्याची सुरूवात केली. त्यातही अग्रक्रम हा स्त्री शिक्षणाला दिला. या सर्व कार्यात महात्मा फुले यांनी त्यांना शिकविले. त्या प्रशिक्षीत शिक्षीका झाल्या. दोघांनी मिळून काढलेल्या शाळेत सावित्रीबाईना अध्यापन केले. त्या एक प्रतिभाशाली कवियत्री आणि नि:स्वार्थी समाजसेविका होत्या. महत्मा फुले यांच्या मृत्युनंतर सत्यशोधक समाजाचे खंबीरपणे नेतृत्व करणाऱ्या महान प्रभावशाली नेत्या होत्या. जोतीरावांप्रमाणेच द्रष्टय होत्या. या उभयतांनी सत्य, समता आणि मानवता यासाठी आयुष्यभर लढा दिला. स्त्री ही पुरूषाइतकीच कर्तबगारी करू शकते हे सावित्रीबाई आपल्या कृतीने सिद्ध केले. म्हणूनच सावित्रीबाई फुले यांनी स्त्री–पुरूष समानता प्रतिपादन करणाऱ्या पहिल्या भारतीय महिला होत्या. सावित्रीबाई फुले यांनी केलेले असिम शिक्षण कार्य या क्षेत्रातील प्रदीर्घ सेवा बरीच वर्षे केलेले अध्यापन, मुख्याध्यापिका म्हणुन कार्य केलेले मानवतावादी कार्य, निरपेक्ष भावनेने आणि त्यागाने केलेली वैचारिक प्रबोधन सावित्रीबाई फुलेच्या भाषणातून प्रतीत होतात.

सावित्रीबाईचा पिंड हा सामाजिक बांधिलकीचा. या बांधिलकीची नाळ गृहत्यागानंतर अधिकच घट्ट होत जाते. सावित्रीबाईचे जीवन हेच मुळी जनसामान्यांना समर्पित होते. साहजिकच या समाजघटकांत कार्य करतांना त्यांचे वैचारिक प्रबोधन करणे हेही त्यांच्या कार्याचे एक अविभाज्य अंग होतेच आणि हे वैचारिक प्रबोधन करतांना सावित्रीबाईच्या हातून जे काही गद्य व पद्य साहित्य निर्माण झाले ते प्रबोधन साहित्यसुद्धा जनसामान्यांना समर्पित होते. खरा प्रतिभावंत कधीच रंजनवादी नसतो. आपल्या प्रतिभेचा उपयोग तो नेहमी समाजहितासाठी करतो. सावित्रीबाईंनी आपल्या भाषणाचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी केला आहे. बहुजन समाज ज्या कारणांमुळे दु:ख, दारिद्र, अपमान व शोषणाच्या सामाजिक व आर्थिक गर्तेत रूतला होता, त्याची नेमकी कारणमीमांसा सावित्रीबाईनी केली. ती निर्भयपणे त्यांच्या भाषणातून प्रकट झाली. शुद्रातिशुद्र समाजाचे दैन्य, शोषण नष्ट करायचे असेल तर या समाजाचे अज्ञान दुर व्हावे, त्यांच्यात चेतना निर्माण व्हावी, सतत कार्यमग्न राहण्याची वृत्ती निर्माण व्हावी, तसेच या समाजाने आपला खोटा अहंकार व अंधश्रद्धापासून मुक्ती होवून सदाचाराने नित्यनिरंतन प्रवृत्त व्हावे. या समाजातील मानसात व्यसनाधिनतेतून मुक्तता व्हावी या साऱ्या सुधारणांचा सावित्रीबाईनी ध्यास घेतला होता. शेतकरी वर्गाने कर्जाच्या विखळयात न अडकता प्रामाणिकपणे कष्ट करून नविन शेती तंत्राच्या साहाय्याने आपला सर्वोत्तम विकास साधून घ्यावा या मानवतावादी दृष्टिकोनातून सावित्रीबाईनी भाषणे दिली आहे. या भाषणाचे त्यांनी विषय ठरवून घेतले होते ते अ.न. - १) उद्योग २) विद्यादान ३) सदाचरण ४) व्यसने व ५) कर्ज या विषयासंदर्भात सावित्रीबाईनी एक एक